पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.महिला व बालकल्याण समिति

**कार्यपत्रिका क्रमांक ७**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक २५/०९/२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २५/**०९/२०१३** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. लोंढे शुभांगी संतोष - सभापती
२) मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. गोफणे अनुराधा देविदास
५) मा. थोरात वनिता एकनाथ
६) मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७) मा.विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.पवार – कार्यालय अधिक्षक, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्र. १) पहिल्या मुलीवर अथवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया केलेल्या दांपत्यांस अर्थसहाय्य देणेबाबत..

विषय क्र. २) पर्यावरण प्रशासन प्रमाणीकरण कार्यक्रमाबाबत..

विषय क्र. ३) पवनाथडी जत्रा एच.ऐ.मैदान पिंपरी येथे आयोजित करणेबाबत..मा.प्रतिभा भालेराव,मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४) आठवडा बाजाराचे आयोजन ४ प्रभागात दिवाळीपुर्वी करणेबाबत..मा.प्रतिभा भालेराव,मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव..

दिनांक ११/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.६** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक – १

दिनांक – २५/०९/२०१३ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.वनिता थोरात

संदर्भः- मा.सहाय्यक आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/०४/कावि/१००/२०१३ दि.११/०९/२०१३

मा.सहाय्यक आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

प्रपत्र अ नुसार पात्र लाभार्थीस आई व मुलगी यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मुदत ठेव पावती स्वरुपात पहिल्या मुलीवर शस्त्रक्रीया करणा-या ३ लाभार्थींना प्रत्येकी र.रु. २५,०००/- प्रमाणे र.रु. ७५०००/- (अक्षरी र.रु.पंच्च्याहत्तर हजार फक्त) व दोन मुलींवर शस्त्रक्रीया करणा-यांस ३८ लाभार्थीस प्रत्येकी र.रु. १००००/- प्रमाणे र.रु. ३,८०,०००/- (अक्षरी र.रु. तीन लाख ऐंशी हजार फक्त) असे एकुण र.रु. ४,५५,००० (अक्षरी र.रु.चार लाख पंच्चावन्न हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कम अदा करणेस तसेच १ मुलीवर अथवा दोन मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्या दांम्पत्यास अर्थसहाय्य देणेची योजना आहे या योजनेमध्ये ज्या लाभार्थींचे अर्ज अपात्र झाले आहेत अशा लाभार्थींनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर त्यांना देखील या योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. (सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक – २

दिनांक – २५/०९/२०१३ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमलताई जगताप

संदर्भः- मा.सहाय्यक आयुक्त् यांचे जा.क्र.नावियो/०४/कावि/११५/२०१३ दि.२१/०९/२०१३

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशदातील पर्यावरण व विकास केंद्रामार्फत कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार यांचा पर्यावरण नियोजन व प्रशासन प्रमाणिकरण कार्यक्रम ( Environment Planning and Administration Certificate Course ( Department of Personnel and Training Government of India) प्रशिक्षण कार्यक्रम दि.२१ ते २३ ऑगस्ट २०१३ दरम्यान आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाकरीता

यशदा यांनी त्यांचेकडील दि.१७/८/२०१३ चे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील २२ महिला बचतगट समन्वयकांचे नामनिर्देशन करण्यात यावे असे पत्राद्वारे कळविले होते. दि.२०/८/२०१३ च्या मान्य प्रस्तावानुसार मा.अतिरिक्त आयुक्त यांनी यशदाकडील संदर्भीय पत्रावर २२-२४ लाभार्थी प्रशिक्षणासाठी जातील तेवढेच पैसे पाठवावेत असे शेरांकन नमुद केले आहे. सदर प्रशिक्षण कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार यांचेतर्फे पुरस्कृत असल्यामुळे या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता नामनिर्देशित अधिका-यांना प्रतिदिन प्रतिप्रशिक्षणाकरीता र.रु.२००/- इतकी रक्कम ( तीन दिवसाकरिता र.रु. ६००/- प्रति प्रशिक्षणार्थी) यशदाकडे जमा करणे आवश्यक असल्याने सदर २४ प्रशिक्षणार्थींचे एकत्रीत र.रु. १४,४००/- (अक्षरी र.रु. चौदा हजार चारशे फक्त ) एवढी रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम अदा करणेकामी मंजुरी घेणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – ३

दिनांक – २५/०९/२०१३

सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.वनिता थोरात

संदर्भ:- मा.प्रतिभा भालेराव,मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव -

पवनाथडी जत्रा २/१/२०१४ ते ५/१/१४ या कालावधीत एच.ए.मैदान पिंपरी येथे आयोजित करणेबाबत व सदर जत्रेच्या आयोजनाकामी र.रु. ४० लाखपर्यंत खर्चास मान्यता देणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ४

दिनांक – २५/०९/२०१३

सुचक – मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक – मा.वनिता थोरात

संदर्भ:- मा.प्रतिभा भालेराव,मा.वनिता थोरात यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील महिलांना व बचतगटातील महिलांना ४ प्रभागात दिवाळीपुर्वी आठवडा बाजाराचे आयोजनाकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजुरी देणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( लोंढे शुभांगी संतोष )**
**सभापती**
मा.महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/९०७/२०१३
दिनांक - २६/ ०९ /२०१३

कार्यालय अधिक्षक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.